कोल्हापूरकरांच्या घामातून उभे राहिलेले विद्यापीठ पोहोचले सर्वोच्च मानांकित स्थानावर : पेठा, तालमीतील कार्यकर्त्यांचा श्रमदानासाठी पुढाकार

# रुपयाचे कुपन..श्रमदान..आणि शिवाजी विद्यापीठ

**साधारण १९५७-५८ चा काळ. पदवी शिक्षण घ्यायचं झालं तर कोल्हापूरच्या विद्यार्थ्यांना पुणे किंवा मुंबई विद्यापीठाचा आधार. त्यामुळे कोल्हापूर व आसपासच्या जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र विद्यापीठाची आवश्यकताच होती. अर्थातच त्यासाठी रेटा सुरु झाला. कोल्हापूरला सरळ काही मागून कधी मिळतच नाही तशीच परिस्थिती या विद्यापीठाच्या मागणीसंदर्भात तयार झाली. पण बाळासाहेब देसाई यांच्यासारखा नेता कोल्हापूरकरांना मिळाला. आणि कोल्हापूरकरांना विद्यापीठ मिळण्याचा मार्ग मोकळा झाला.**

सुधाकर काशीद
कोल्हापूर

विद्यापीठ उभे करायचे म्हणजे विस्तीर्ण जागा, पाणी, रस्ते या अगदी मूलभूत गरजा. मग जागेचा शोध सुरु झाला. आणि शहराच्या पूर्वेला पुणे-बंगळूरू रस्त्यालगतच्या जागेची चर्चा सुरु झाली. या जागा जगदाळे, सरनाईक, पायमल, साळुंखे, थोरात, मंडलिक, माने यांच्यासारख्या बहुजन समाजातील लोकांच्या होत्या. पाण्याची पुरेशी सोय नव्हती. त्यामुळे पिके फार काही मिळत नव्हती. सर्वत्र बाभळीचे बन पसरले होते. या जमीनसदृश माळावर दिवसभर म्हशी चरत असायच्या. अंधार पडला की सारे सामसूम व्हायचे.

या जमिनीवर विद्यापीठाचा परिसर उभा करण्याचे निश्चित झाले. त्यावेळी कोल्हापूर नगरपालिकेत शेतकरी कामगार पक्षाची सत्ता होती. आणि नगराध्यक्ष होते केशवराव जगदाळे हा माणूस व्यवसायाने टेलर. पण शेकापचे निष्ठावान कार्यकर्ते ते सायकलवरुन शहरात फिरायचे. आपल्या कोल्हापुरात विद्यापीठ होते म्हटल्यावर ही

**तरुण भारत**
**विशेष वृत्त**

सारी कार्यकर्ते मंडळी उत्साहाने कामाला लागली. विद्यापीठाचे प्राथमिक कामकाज महागावकर यांच्या बंगल्यात (आताचे हॉटेल ओपल) येथे पहिले कुलगुरू आप्पासाहेब पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु झाले. भूमिपूजन समारंभ नगराध्यक्ष केशवराव जगदाळे यांच्या हस्ते झाला. आणि आपल्या गावात विद्यापीठ उभारत आहे म्हटल्यावर कोल्हापुरातील पेठा पेठातील, तालमी तालमीतील कार्यकर्ते श्रमदानासाठी पुढे आले. आज या पेठेतील, उद्या त्या पेठेतील असे वेळापत्रक ठरवून कार्यकर्ते टकात बसून या माळावर श्रमदानासाठी जाऊ लागले.


कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ इमारत उभारणीची सुरुवात श्रमदानाने करताना तत्कालीन नगराध्यक्ष केशवराव जगदाळे. सोबत पहिले कुलगुरु आप्पासाहेब पवार आदी.

हे श्रमदान कमी म्हणून की काय, विद्यापीठ उभारणीसाठी आर्थिक मदत म्हणून रुपया रुपयाची कुपने काढण्यात आली. केशवराव जगदाळे, रामभाऊ उबाळे, डी. एस. नार्वेकर, हिंदुराव साळुंखे, बाळ साठम, काका राऊत, ए. आर. साळुंखे हे व अन्य कार्यकर्ते गावभर फिरुन कुपने खपवू लागले. इमारतीच्या पायाचा दगड त्यातून रचला जाऊ लागला. रखरखत्या उन्हातील तंबूखाली बसून कामावर नजर ठेवली जाऊ लागली. आणि या फोंड्या जमिनीवर विद्यापीठाची इमारत हळूहळू आकारास येऊ लागली. तोपर्यंतच्या कामकाजासाठी महागावकर यांची इमारत कार्यालय म्हणून वापरली जाऊ लागली.

हळूहळू विद्यापीठ आकाराला येऊ लागले. विद्यापीठातील नोकरीसाठी बहुजन समाजातील तरुणांना संधी देण्यात आली. आणि नेहमीप्रमाणे विद्यापीठावर टीका व्हायला सुरुवात झाली. तालमीच्या कट्ट्यावर बसणाऱ्या पोरांची विद्यापीठात भरती केल्यावर ते काय गुण उधळणार असा टीकेचा सूर होता. पण याच पोरांनी शिवाजी विद्यापीठाची शान वाढवत नेली. विद्यापीठाची परीक्षा एकदाही पुढे जाणार नाही, निकाल कधी लांबणार नाही याची खबरदारी कर्मचाऱ्यांनी १०० टक्के घेतली. १९६९ साली विद्यापीठात कमवा शिका योजना सुरु झाली. विद्यापीठात गवंडी, सुतार, माळी, फिटर काम करून गोरगरिबांची पोरं शिकू लागली. विद्यापीठाच्या दर्जावर अधूनमधून ठराविक गटाकडून टीकाटिप्पणी होतच राहिली. पण शिवाजी विद्यापीठाने आपली वाटचाल कायम ठेवली. यावर्षी तर राष्ट्रीय मूल्यांकन (नॅक) परिषदेने विद्यापीठाच्या प्रत्येक घटकाचा बारीक-सारीक आढावा घेतला व ए प्लस प्लस असे विद्यापीठाला मानांकन दिले. हे मानांकन म्हणजे विद्यापीठाच्या वाटचालीवर मानाचा शिरपेच आहे. जरूर या शिरपेचाने विद्यापीठाची शान अधिक डौलदार झाली आहे. पण विद्यापीठाची इमारत उभी करताना कोल्हापूरकरांनी श्रमदान करून या माळावर आपला घाम गाळला आहे ही स्मृती नव्या पिढीला मानिमित्ताने होणे आवश्यक आहे.

**नव्या इमारतीचे उद्घाटन २३ एप्रिल १९७१ रोजी**

विद्यापीठाची सुरुवात नोव्हेंबर १९६२ रोजी तत्कालीन राष्ट्रपती डॉक्टर एस. राधाकृष्णन यांच्या हस्ते झाली. व नव्या इमारतीचे उद्घाटन संरक्षण मंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते २३ एप्रिल १९७१ रोजी झाले.

**आजवर १३ कुलगुरूंचा विद्यापीठाच्या वाटचालीत हातभार**

विद्यापीठाचे पहिले कुलगुरू आप्पासाहेब पवार व कुलसचिव वैद्य होते. आजवर १३ कुलगुरुंनी विद्यापीठाच्या वाटचालीत हातभार लावला. सध्याचे कुलगुरू डी. टी. शिर्के, प्रकुलगुरु पी. एस. पाटील व कुलसचिव विलास नांदवडेकर आहेत.

**पन्हाळगडावर अंतिम अहवाल**

शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेसंदर्भात अहवाल करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने ११ सदस्यांची समिती नेमली होती. त्यात ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ सि. रा. तावडे, तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी, बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर, राजारामबापू पाटील, प्रा. ना. सि. फडके, डॉक्टर बी. एस. पाटील, डॉ. बी. एस. नाईक, व्ही. ए. आपटे, आर. एम. मुगळी यांचा समावेश होता. ४ जानेवारी १९६२ रोजी पन्हाळ्यावर अंतिम अहवालावर सह्या करण्यात आल्या.




# पहिल्या सात संस्थांत शिवाजी विद्यापीठ

## नॅककडून ए प्लस प्लस मानांकन; अकृषी विद्यापीठांमधील देशात ठरले दुसरे

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १ : राष्ट्रीय मूल्यांकन तथा प्रत्यायन परिषदेकडून (नॅक) २०१८ पासून आजपर्यंत राष्ट्रीय पातळीवर केवळ सात संस्थांना ए प्लस प्लस मानांकन प्राप्त झाले असून, त्यात शिवाजी विद्यापीठाचा समावेश झाला आहे. हे मानांकन मिळविणारे शिवाजी विद्यापीठ दुसरे राज्य अकृषी विद्यापीठ ठरले असल्याची माहिती



शिवाजी विद्यापीठाच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. एम. एस. देशमुख यांनी दिली.

डॉ. कामत व देशमुख यांनी दिलेल्या माहितीनुसार, नॅककडून प्राप्त झालेल्या यादीत २०१८ पासून ए प्लस प्लस मानांकन मिळविणाऱ्यांत तमिळनाडूमधील मदुराई कामराज विद्यापीठ आणि शिवाजी विद्यापीठाचा समावेश आहे. यातील मदुराई कामराज विद्यापीठाचे सीजीपीए गुणांकन ३.५४ इतके आहे, तर शिवाजी विद्यापीठाचे ३.५२ इतके आहे.

उर्वरित पाचमध्ये बंगळूर येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स (आय.आय.एस.सी.) ही एकमेव केंद्रीय संस्था आहे, तर बनस्थळी विद्यापीठ (राजस्थान), रामकृष्ण मिशन विवेकानंद एज्युकेशनल अँड रिसर्च इन्स्टिट्यूट (पश्चिम बंगाल), कोनेरु लक्ष्मैय्या एज्युकेशन फाउंडेशन (आंध्र प्रदेश) आणि एसआरएम इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी (चेन्नई, तमिळनाडू) या अभिमत विद्यापीठ दर्जाच्या शैक्षणिक संस्था आहेत.

### गुणवत्तेचा चढता क्रम

विद्यापीठाने नॅकच्या चार फेऱ्यांना सामोरे जाताना सातत्याने गुणवत्ता उंचावत नेली आहे. २००४ मध्ये विद्यापीठ पहिल्यांदा नॅक मूल्यांकनास सामोरे गेले. त्या वेळी विद्यापीठास ७७.७५ (ऑन द स्केल ऑफ १००) सीजीपीए गुणांकनासह बी प्लस मानांकन प्राप्त झाले. २००९ मध्ये २.८५ (ऑन द स्केल ऑफ ४) सीजीपीए गुणांकनासह बी मानांकन प्राप्त केले. २०१४ मध्ये ३.१६ सीजीपीए गुणांकनासह ए मानांकन प्राप्त केले, तर यंदा अधिक चमकदार कामगिरी करत ३.५२ गुणांकनासह ए प्लस प्लस मानांकन प्राप्त केले आहे, अशी माहितीही डॉ. कामत यांनी दिली.

# ‘अ++’ मिळविणारे देशातील दुसरे राज्य विद्यापीठ

# शिवाजी विद्यापीठाच्या कर्तृत्वाचा झेंडा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

'नॅक'कडून २०१८ पासून आजपर्यंत राष्ट्रीय पातळीवर केवळ सात संस्थांना 'अ++' मानांकन प्राप्त झाले. त्यामध्ये शिवाजी विद्यापीठाचा समावेश झाला आहे. असे मानांकन मिळविणारे शिवाजी विद्यापीठ दुसरे राज्य अकृषी विद्यापीठ ठरले आहे.

राष्ट्रीय मूल्यांकन तथा प्रत्यायन परिषद (नॅक) यांच्याकडून २०१८ पासून 'अ++' मानांकन मिळविणाऱ्या राष्ट्रीय स्तरावर केवळ सात उच्च शिक्षण संस्थांमध्ये दोन राज्य विद्यापीठे आहेत. तमिळनाडूमधील मदुराई कामराज विद्यापीठ व शिवाजी विद्यापीठ यांचा यामध्ये समावेश आहे.

उर्वरित पाचमध्ये बेंगलोर येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स ही एकमेव केंद्रीय संस्था आहे. बनस्थळी विद्यापीठ (राजस्थान), रामकृष्ण मिशन विवेकानंद एज्युकेशनल अँड रिसर्च इन्स्टिट्यूट (पश्चिम बंगाल), कोनेरू लक्ष्मैया एज्युकेशन फाऊंडेशन (आंध्र प्रदेश), एसआरएम इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी (तमिळनाडू) या संस्था आहेत, अशी माहिती डॉ. आर. के. कामत, डॉ. एम. एस. देशमुख यांनी दिली.

## गुणवत्तेचा चढता क्रम

शिवाजी विद्यापीठाने सातत्याने गुणवत्ता उंचावली आहे. २००४ मध्ये शिवाजी विद्यापीठ पहिल्यांदा नॅकच्या मूल्यांकनास सामोरे गेले. त्यावेळी विद्यापीठास ७७.७५ (ऑन द स्केल ऑफ १००) सीजीपीए गुणांकनासह 'ब+' मानांकन प्राप्त झाले. २००९ मध्ये २.८५ (ऑन द स्केल ऑफ ४) सीजीपीए गुणांकनासह 'ब' मानांकन प्राप्त केले. २०१४ मध्ये ३.१६ सीजीपीए गुणांकनासह 'अ' मानांकन प्राप्त केले. यंदा चमकदार कामगिरीचे प्रदर्शन करीत ३.५२ गुणांकनासह 'अ++' मानांकन प्राप्त केले आहे.

# मानांकन मिळवणारे शिवाजी विद्यापीठ दुसरे

## डॉ. आर. के. कामत, एम. एस. देशमुख यांची माहिती

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

'नॅक' (बंगळुरू) यांच्याकडून २०१८ पासून आजपर्यंत राष्ट्रीय पातळीवर केवळ सात संस्थांना 'ए प्लस प्लस मानांकन प्राप्त झाले असून, त्यामध्ये शिवाजी विद्यापीठाचा समावेश झाला आहे. असे मानांकन मिळवणारे शिवाजी विद्यापीठ अवघे दुसरे राज्य विद्यापीठ ठरले आहे. ही माहिती शिवाजी विद्यापीठाच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. एम. एस. देशमुख यांनी दिली.

राष्ट्रीय मूल्यांकन तथा प्रत्यायन परिषद (नॅक) यांच्याकडून प्राप्त झालेल्या यादीमध्ये २०१८ पासून ए प्लस प्लस मानांकन मिळवणाऱ्या राष्ट्रीय स्तरावर केवळ सात उच्च शिक्षण संस्था आहेत. त्यामध्ये अवघी दोन राज्य विद्यापीठे आहेत. तमिळनाडूमधील मदुराई कामराज विद्यापीठ आणि येथील शिवाजी विद्यापीठ अशा दोन विद्यापीठांचा त्यात समावेश आहे. यातील मदुराई कामराज विद्यापीठाचे सीजीपीए गुणांकन ३.५४ इतके आहे, तर शिवाजी विद्यापीठाचे ३.५२ इतके आहे. उर्वरित पाचमध्ये बेंगलोर येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स ही एकमेव केंद्रीय संस्था आहे, तर वनस्थळी विद्यापीठ (राजस्थान), रामकृष्ण मिशन विवेकानंद एज्युकेशनल अँड रिसर्च इन्स्टिट्यूट (पश्चिम बंगाल), कोनेरू लक्ष्मैया एज्युकेशन फाऊंडेशन (आंध्र प्रदेश) आणि एसआरएम इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी (चेन्नई, तमिळनाडू) या डीम्ड टू बी युनिव्हर्सिटी दर्जाच्या शैक्षणिक संस्था आहेत. शिवाजी विद्यापीठाने 'नॅक'च्या चार फेऱ्यांना सामोरे जात असताना सातत्याने आपली गुणवत्ता उंचावत नेल्याचे दिसून येते.

सम्मान | विश्वविद्यालय के इतिहास में ऐतिहासिक पल

# शिवाजी विश्वविद्यालय को 'ए++' रेटिंग

नवभारत न्यूज नेटवर्क

**कोल्हापुर.** 'नैक' की ओर से हुए चौथे पुनर्मूल्यांकन में शिवाजी विश्वविद्यालय को 3.52 सीजीपीए स्कोर के साथ 'ए++' का रेटिंग प्राप्त हुआ है. यह वाकई में विश्वविद्यालय के लिए एक ऐतिहासिक पल है और इससे विश्वविद्यालय से जुड़े सभी लोग काफी खुश हैं. ऐसी प्रतिक्रिया विश्वविद्यालय के कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के ने दी.

## शिवाजी की प्रतिमा का अभिवादन

शिवाजी विश्वविद्यालय को नैक द्वारा ए++ रेटिंग प्राप्त होने की जानकारी मिलते ही कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटिल समेत सभी अधिकारियों ने विश्वविद्यालय की मुख्य प्रशासकीय इमारत के समक्ष मौजूद छत्रपति शिवाजी महाराज की प्रतिमा पर माल्यार्पण कर अभिवादन किया और अपनी खुशी का इजहार किया.

## नैक ने लिया था विश्वविद्यालय के कामकाज का जायजा

इस विषय के संदर्भ में जानकारी देने के लिए डॉ. शिर्के ने एक प्रेस वार्ता का आयोजन किया. इस प्रेस वार्ता में प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटिल, वित्त एवं लेखाधिकारी वी. टी. पाटिल, आईक्यूएसी के संचालक डॉ. एम. एस. देशमुख उपस्थित थे. प्रा. आर. के. कामत ने नैक की प्रक्रिया के संबंध में विस्तार से जानकारी दी. डॉ. डी. टी. शिर्के ने बताया कि, नैक की टीम द्वारा 15 से 17 मार्च 2021 के दौरान शिवाजी विश्वविद्यालय का दौरा कर विश्वविद्यालय के कामकाज का जायजा लिया. विश्वविद्यालय की ओर से इस टीम को स्वयं मूल्यनिर्धारण रिपोर्ट पेश की. इसमें कुल 7 मानदंड होते है. इन मानदंडों में अध्ययन-अध्यापन प्रणालि, अनुसंधान, नवाचार तथा विस्तार, बुनियादी सुविधाएं, अध्ययन के स्रोत, छात्र सहाय्यता और प्रगति, प्रशासन, नेतृत्व और प्रबंधन तथा संस्थात्मक मूल्यों और विभिन्न तरह के उपक्रम के आधार पर नैक की टीम की ओर से विश्वविद्यालय की रेटिंग निश्चित की.



## सर्वश्रेष्ठ बनाने के लिए और मेहनत करेगा प्रबंधन

उन्होंने बताया कि, शिवाजी विश्वविद्यालय को एक बेहतरीन परंपरा है. इस विश्वविद्यालय ने हमेशा ही शिक्षा के क्षेत्र में ऐतिहासिक कार्य किया है. विश्वविद्यालय से जुड़े सभी लोग इसे और बेहतर बनाने का प्रयास करते है. यही कारण है कि, इस विश्वविद्यालय को ऐतिहासिक ए++ रेटिंग प्राप्त हुआ है. इस रेटिंग के कारण अब विश्वविद्यालय के छात्र, अनुसंधानकर्ता, शिक्षक सभी को काफी अच्छा लाभ होगा. इस रेटिंग से विश्वविद्यालय से जुड़े सभी लोगों में उत्साह का माहौल है. विश्वविद्यालय के काम को सर्वोत्तम बनाने के लिए हम जमकर प्रयास करेंगे. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर ने सभी का स्वागत किया, जबकि जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर ने आभार प्रकट किया.

02 APR 2021

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ 'ए प्लस प्लस' मानांकनात देशात द्वितीय

- राष्ट्रीय स्तरावर फक्त सात संस्था 'ए प्लस प्लस मानांकित

प्रतिनिधी
कोल्हापूर

'नॅक' (बंगळूरू) यांचेकडून सन २०१८पासून आजपर्यंत राष्ट्रीय पातळीवर केवळ सात संस्थांना 'ए प्लस प्लस' मानांकन प्राप्त झाले आहे. त्यामध्ये शिवाजी विद्यापीठाचा समावेश झाला आहे. त्याचप्रमाणे असे मानांकन मिळविणारे शिवाजी विद्यापीठ अवघे दुसरे राज्य अकृषी विद्यापीठ ठरले आहे. ही माहिती शिवाजी विद्यापीठाच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. एम. एस. देशमुख यांनी दिली आहे.



डॉ. कामत व देशमुख यांनी दिलेल्या माहितीनुसार, राष्ट्रीय मूल्यांकन तथा प्रत्यायन परिषद (नॅक) यांचेकडून प्राप्त झालेल्या यादीमध्ये सन २०१८पासून 'ए प्लस प्लस' मानांकन मिळविणाऱ्या राष्ट्रीय स्तरावर केवळ सात उच्चशिक्षण संस्था आहेत. त्यामध्ये अवघी दोन राज्य विद्यापीठे आहेत. तमिळनाडूमधील मदुराई कामराज विद्यापीठ आणि येथील शिवाजी विद्यापीठ अशा दोन विद्यापीठांचा त्यात समावेश आहे. यातील मदुराई कामराज विद्यापीठाचे सीजीपीए गुणांकन ३.५४ इतके आहे, तर शिवाजी विद्यापीठाचे ३.५२ इतके आहे. उर्वरित पाचांत बेंगलोर येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स (आय.आय.एस.सी.) ही एकमेव केंद्रीय संस्था आहे, तर बनस्थळी विद्यापीठ (राजस्थान), रामकृष्ण मिशन विवेकानंद एज्युकेशनल अँड रिसर्च इन्स्टिट्यूट (पश्चिम बंगाल), कोनेरु लक्ष्मैय्या एज्युकेशन फाऊंडेशन (आंध्र प्रदेश) आणि एसआरएम इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी (चेन्नई, तमिळनाडू) या डीम्ड टू बी युनिव्हर्सिटी दर्जाच्या शैक्षणिक संस्था आहेत.

### गुणवत्तेचा चढता क्रम

शिवाजी विद्यापीठाने 'नॅक'च्या चार फेऱ्यांना सामोरे जात असताना सातत्याने आपली गुणवत्ता उंचावत नेल्याचे दिसून येते. सन २००४ मध्ये शिवाजी विद्यापीठ पहिल्यांदा नॅकच्या मूल्यांकनास सामोरे गेले, त्यावेळी विद्यापीठास ७७.७५ (ऑन द स्केल ऑफ १००) सीजीपीए गुणांकनासह 'ब प्लस' मानांकन प्राप्त झाले. सन २००९ साली २.८५ (ऑन द स्केल ऑफ ४) सीजीपीए गुणांकनासह 'ब' मानांकन प्राप्त केले. सन २०१४ मध्ये ३.१६ सीजीपीए गुणांकनासह 'अ' मानांकन प्राप्त केले, तर यंदा अधिक चमकदार कामगिरीचे प्रदर्शन करीत ३.५२ गुणांकनासह 'ए प्लस प्लस' मानांकन प्राप्त केले आहे, अशी माहितीही डॉ. कामत यांनी दिली.

शिवाजी विद्यापीठातील बैठकीत चर्चा : संभाजीराजे, इतिहास संशोधक-अभ्यासकांची उपस्थिती

# पाठ्यपुस्तकांच्या प्रमाणीकरणासाठी तज्ज्ञ समिती

लोकमत न्यूज नेटवर्क



शिवाजी विद्यापीठात गुरुवारी विविध प्रकाशकांच्या पाठ्यपुस्तकांच्या प्रकाशनाबाबत विशेष बैठकीत खासदार संभाजीराजे यांनी सूचना केल्या. यावेळी शेजारी डॉ. जयसिंगराव पवार, पी. एस. पाटील, डी. टी. शिर्के, विलास नांदवडेकर, इंद्रजित सावंत, राम यादव, आदी उपस्थित होते.

**कोल्हापूर :** वेगवेगळ्या प्रकाशनांकडून प्रकाशित करण्यात येणाऱ्या पाठ्यपुस्तके, अभ्यास साहित्याला (स्टडी मटेरियल) अधिकृतपणे प्रमाणित करण्यासाठी शिवाजी विद्यापीठाच्यावतीने तज्ज्ञ समिती नियुक्त करणे. या समितीकडून प्रमाणित झाल्यानंतरच प्रकाशकांना पाठ्यपुस्तक वितरित करण्याची परवानगी देण्याबाबत गुरुवारी विद्यापीठातील बैठकीत चर्चा करण्यात आली.

विद्यापीठाच्या अभ्यासक्रमास अनुसरून अनेक प्रकाशनांकडून पाठ्यपुस्तके प्रकाशित केली जातात. या पाठ्यपुस्तकांमध्ये काही वेळेस आक्षेपार्ह मजकूर छापल्याने वादाचे प्रसंग ओढवले आहेत. यासाठी उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने खासदार संभाजीराजे यांच्या पुढाकाराने विद्यापीठात गुरुवारी व्यवस्थापन परिषद हॉलमध्ये विशेष बैठक घेण्यात आली. विद्यापीठाच्या अभ्यासक्रमासंबंधित कोणत्याही प्रकाशकाकडून पुस्तक प्रकाशित होताना त्यातील मजकूर विद्यापीठाकडून तपासून घेण्यात यावा, अशी सूचना खासदार संभाजीराजे यांनी केली. बी. ए., एम.ए. इतिहास या विषयाच्या अभ्यासक्रमात महाराणी ताराबाई राणीसाहेब, कोल्हापूरच्या महाराणी जिजाबाईसाहेब, क्रांतिवीर छत्रपती चिमासाहेब महाराज, करवीर राज्याचा इतिहास समाविष्ट करण्यात यावा. प्रकाशकांच्या पाठ्यपुस्तकांच्या प्रमाणीकरणासाठी तज्ज्ञ समिती नियुक्त करावी, अशी सूचना ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी केली. अभ्यासक्रम अद्ययावत करण्याबाबत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी इतिहास विभागप्रमुखांना सूचना दिल्या.

## अभ्यास साहित्य विद्यापीठाने प्रकाशित करावे

विद्यापीठाचा अभ्यासक्रम पारंपरिक असून त्यामध्ये योग्य बदल करावेत. पाठ्यपुस्तके आणि अभ्यासाचे साहित्य विद्यापीठानेच प्रकाशित करावे. त्यासाठी आम्ही मदत करण्यास तयार आहोत, असे इतिहास अभ्यासक इंद्रजित सावंत यांनी सांगितले.



# शिवाजी विद्यापीठाला नॅककडून ए प्लस प्लस मानांकन

**कोल्हापूरः** कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाला बंगळुरु येथील राष्ट्रीय मूल्यांकन परिषदेकडून ए प्लस प्लस मानांकन मिळाले आहे. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी ही माहिती दिली. नॅकच्या नव्या मानांकनासह ३.५२ गुण मिळवत शिवाजी विद्यापीठ राज्यात अव्वल ठरले आहे, असे त्यांनी सांगितले. शिवाजी विद्यापीठ हे महाराष्ट्रातील अव्वल विद्यापीठ समजले जाते. विद्यापीठाचे कार्यक्षेत्र कोल्हापूर, सांगली आणि सातारा या तीन जिल्ह्यांमध्ये आहे.

## डॉ. डी. टी. शिर्के आक्टोबरमध्ये कुलगुरुपदी

डॉ .दिगंबर शिर्के यांनी ऑक्टोबर महिन्यात शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु म्हणून कार्यभार स्वीकारला होता . त्यांनी शिवाजी विद्यापीठात संख्याशास्त्र विषयात एम .एस्सी, एम फिल, पीएच .डी केली . त्यांनी संख्याशास्त्र विभागाचे विभागप्रमुख, कुलसचिव, प्र-कुलगुरू पदावर काम केले आहे . ३३ वर्षांचा त्यांना अनुभव आहे .

## नॅकच्या नव्या मानांकनासह जबाबदारी वाढली

शिवाजी विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रगतीचे मूल्यमापन बंगळुरु येथील राष्ट्रीय मूल्यांकन परिषदेकडून करण्यात आले होते . शिवाजी विद्यापीठाचे यापूर्वी तीनवेळा मूल्यांकन झालेले आहे . तिसऱ्या टप्प्यातील मूल्यांकनामध्ये 'ए' मिळाले होते . आता चौथ्या टप्प्यातील मूल्यांकनामध्ये ए प्लस प्लस मानांकन मिळाले आहे . नव्या गुणांकन पद्धतीनुसार ३ .५२ इतके गुण मिळाले आहेत . या मानांकनामुळे विद्यापीठाची जबाबदारी वाढली असल्याचे कुलगुरुंनी म्हटले आहे. पुढील काळात आता मिळवलेले यश कायम टेवण्यासोबतच शिक्षण क्षेत्रात नवी झेप घेण्याचे आव्हान आपल्या समोर आहे, असे ते म्हणाले.


|| राष्ट्रदेवो भवः ||


सेल्फप्राइमिंग पम्पस्

CED कोटेड CI पार्टस्

फाल्कन®

A MACHINE FOR MANKIND

Since 1994



थर्मल ओवरलोड प्रोटेक्शन के साथ

उच्च कार्यक्षमता के साथ पंप की लंबी आयु

20% से 30% बिजली की महाबचत

Mfg. by: Falcon Pumps Pvt. Ltd.

सनलाईट-50

डिलरशीप ईन्कवायरी आवकार्य*

*Condition Apply

Falcon Global Sales Pvt. Ltd. - Nagpur / Mumbai

nagpur@falconpumps.in / mumbai@falconpumps.in

Nagpur Branch : 83789 88448 / 07104 295544 Mumbai Branch : 77188 21200

# दुसऱ्या दिवशीही विद्यापीठावर शुभेच्छांचा वर्षाव

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाला 'नॅक'चे 'ए-प्लस प्लस' मानांकन बुधवारी मिळाले. त्याबद्दल विविध घटकांनी दुसऱ्या दिवशी गुरुवारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, आदींवर शुभेच्छांचा वर्षाव केला. डी.वाय. पाटील अभिमत विद्यापीठाचे कुलपती डॉ. संजय डी. पाटील, आमदार जयंत आसगावकर, शिवसेनेचे जिल्हा प्रमुख संजय पवार, विजय देवणे, आदींनी प्रत्यक्ष भेटून कुलगुरू डॉ. शिर्के यांना शुभेच्छा दिल्या.

'नॅक'च्या प्रक्रियेत काम करणारे अधिकारी, कर्मचारी यांना प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, संशोधक विद्यार्थी, निवृत्त अधिकारी, कर्मचारी, विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळांतील सदस्य, आदींनी प्रत्यक्ष भेटून, तर अनेकांनी दूरध्वनी, सोशल मीडियाच्या माध्यमातून शुभेच्छांचा वर्षाव केला. मान्यवर आणि नागरिकांनी दूरध्वनी, ई-मेलद्वारे अभिनंदन करावे, असे आवाहन कुलगुरू डॉ. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष

02 APR 2021

तरुण भारत

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कौतुक विद्यापीठाचे ....



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाला नॅकचे 'ए प्लस प्लस' मानांकन मिळाले. त्याबद्दल खासदार संभाजीराजे यांनी गुरूवारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि त्यांच्या सहकाऱ्यांची भेट घेऊन अभिनंदन केले. यावेळी इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार, युवा इतिहास संशोधक इंद्रजित सावंत, कुलसचिव विलास नांदवडेकर, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, इतिहास अभ्यासक राम यादव आदी.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 APR 2021
Times of India

# NAAC awards A++ grade to Shivaji University Kolhapur

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** Shivaji University Kolhapur (SUK) scored A++ grade in the fourth round of the re-accreditation process conducted by the team of National Assessment and Accreditation Council (NAAC) between March 15 and 17.

The announcement has brought cheer among university officials, who were striving hard to get the grade upgraded. Five years ago, NAAC had awarded an 'A' grade. The university also has improved its cumulative grade point average (CGPA) to 3.52 from 3.16.

University vice-chancellor D T Shirke said, "The A++ grade will benefit the researchers, teachers and students directly and indirectly. Also, it will help colleges affiliated with the university. SUK has performed well in students assistance, progress, academics and new initiatives categories of assessment."

The university is now eligible for several funding schemes of central and state government meant for research and upgradation of infrastructure. It will also be able to get fundings from various industries and tie up for various research-based activities. In recent months, the university's efforts in the field of research have been lauded by the central government. The university has been granted over Rs 5 crore under a central government scheme with the help, of which interdisciplinary research activities will be undertaken.